शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal)
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०



## सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)
ता. कराड जि. सातारा
राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

Scanned by CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed refered Research Journal - ISSN No. 2319-6025)]
( विद्यापीठ अनुदान अयोग नवी दिल्ली, मान्यता अ.क्र. ६४१७५ )

## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा)

वर्षे नववे : अंक एकवीस - बावीस
जानेवारी - फेब्रुवारी - मार्च - एप्रिल - मे - जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

**संपादक**

डॉ. शिवकुमार सोनाळकर

**अतिथी संपादक**

डॉ. मोहन राजमाने,
प्राचार्य, स.गा.म. कॉलेज, कराड

डॉ. रेश्मा दिवेकर प्रा. डॉ. रमेश पोळ

**कार्यकारी संपादक**

डॉ. नीला जोशी

**संपादक मंडळ**

डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश बाघुंबरे

**सल्लागार समिती**

डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११

**मुद्रक**

श्रीधर मुद्रणालय, कराड
३३८, सोमवार पेठ, कराड ४१५११०
मोबा. ९८९०४९८४९७

**मूल्य : ३००/-**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी श्रीधर मुद्रणालय, कराड येथे छापून अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मताशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.



Scanned by CamScanner

* वीरशैव संप्रदाय आणि श्रीबसवेश्वरांचे कार्य
डॉ.सुभाष जाधव ४०७
* लिंगायत धर्माचे तत्त्वज्ञान
डॉ. मांतेश हिरेमठ ४११
* युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वरांचे प्रेरणादायी वचन साहित्य
संगीता आरळी ४१६
* महात्मा बसवेश्वरांच्या बसववचनातील स्त्रीविषयक जाणिवा
प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे ४२०
* शिवशरणी अक्कमहादेवी यांच्या वचनसाहित्यातील विचारतत्त्वे
डॉ. दत्ता पाटील ४२३
* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील समर्थ संप्रदायाचे अवलोकन
डॉ. शिवाजी पाटील ४२७
* समर्थ संप्रदाय
डॉ. शर्मिला घाटगे ४३०
* समर्थ संप्रदाय
प्रा.महेश कुलकर्णी ४३४
* रामदासांचा समर्थ संप्रदाय
डॉ. वैशाली औताडे ४३७
* समर्थ संप्रदाय: तत्त्वज्ञान आणि वाङ्मय
प्रा.अंकुश घुले ४४०
* मनाच्या आरोग्यासाठी मनाचे श्लोक
डॉ.संग्राम थोरात ४४४
* रामदासांची लोकशिक्षकाची भूमिका
डॉ. सविता माळी ४४७
* वेणाबाई ते वेणास्वामी
डॉ. रेश्मा दिवेकर ४५२
* गुरू नानकदेवजींचा पुरोगामी दृष्टीकोन
डॉ.सुभाष वाघमारे ४५६
* मुस्लिम आणि ख्रिस्ती संतांचे योगदान
डॉ. बाळासाहेब चव्हाण ४६१
* 'मुडलगी संप्रदायातील मराठी संत कवयित्री- राधाबाई'
डॉ. धनंजय होनमाने ४६६
* चिमड संप्रदायाच्या प्रचार व प्रसारासाठी साहित्यसंपदेचे योगदान
नारायण आपटे, ४६९
* नागेश संप्रदाय आणि अज्ञानसिद्धांच्या साहित्यातील समाज-संस्कृती दर्शन
डॉ. देवीदास गायकवाड ४७२
* आनंदसंप्रदाय आणि त्यांचे वाङ्मय
डॉ. बाळकृष्ण शिंदे ४७६

ISSN No. 2319-6025



Scanned by CamScanner

# वीरशैव संप्रदाय आणि श्रीबसवेश्वरांचे कार्य

**डॉ.सुभाष जाधव**
श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी

कोणत्याही संप्रदायाचा अभ्यास करण्यापूर्वी प्रथमता संप्रदाय म्हणजे काय ? या गोष्टीचा विचार करावा लागतो. संप्रदाय हा काही वेळा धर्माशी निगडीत असतो. त्यामुळे या संप्रदायाच्या संदर्भात र.रा.गोसावी जे मत स्पष्ट करतात ते महत्त्वाचे ठरते ते म्हणतात - ''संप्रदाय या संज्ञेतून पारमार्थिक अनुभूतींचा साठा आणि तो प्राप्त करुन उपभोगण्याचा साधनमार्ग हा प्रमुख आशय व्यक्त होतोच. परंतु त्याबरोबर या साधन मार्गाचे संरक्षण, संवर्धन आणि एक पिढीतून दुसऱ्या पिढीत श्रध्दा, विश्वास, आचार, तत्त्वज्ञान, उपासना स्थाने, विभुती आणि विशेषकरुन देवता स्वरुप यासह अधिकृतपणे होणारे संक्रमण आणि त्यातून आकारास येणारी एक विशिष्ट परंपरा, एवढा व्यापक आशयही व्यक्त होतो. ''

वीरशैव संप्रदायाचे उपास्यदैवत शंकर आहे. श्री बसवेश्वरांनी भक्तीभाव म्हणून शिवाची उपासना केली. शंकराची उपासना ही लिंगसंबंध्द आहे. म्हणून उपासनेचे वेगळेपण म्हणून देहावर शिवलिंग धारण करणे हा दीक्षाविधी होताना दिसतो. समाजात एकात्मता टिकवून नवविचार निर्माण करणे हे महत्त्वाचे असते. असे कार्य अनेक महात्त्म्यांनी पूर्वीपासूनच केले आहे. यातील एक महात्त्मे म्हणजे श्री बसवेश्वर हे होत. बसवेश्वरांनी १२ व्या शतकात वीरशैव संप्रदायास स्फूर्तीदायक ठरविण्यासाठीचे उपयुक्त कार्य केले. बसवेश्वरांचे चरित्र अनेक ग्रंथात चित्रीत झालेले आहे. यामध्ये संस्कृत भाषेतील 'बसवपुराण', 'प्रभुलिंगलीला' आणि 'बसवपुराण षटकम्' या तीन ग्रंथांचा समावेश होतो. याबरोबरच मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतूनही बसवेश्वरांची चरित्रे आहेत.

बसवेश्वरांचा जन्म इ.स.११३१ मध्ये विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी येथे वैशाखातील अक्षयतृतीयेस झाला. असे अनेक अभ्यासकांनी मान्य केले आहे. त्यांचे वडील मादिराज व आई मादलांबिका हे होत. हे शैव ब्राह्मण असून नंदिश्वराचे भक्त होते. मादलांबीने नंदिश्वरास नवस केला आणि पुत्रप्राप्ती झाली. नंदिच्या कृपेने पुत्र प्राप्ती झाली म्हणून त्याचे नाव बसव ठेवले असे पुराणात सांगितले आहे. अशा या बसवेश्वरांवर बालवयातच चांगले संस्कार झाले. घरात विधीवत पूजा होत असल्याने त्यांनी ते लहानपणापासून पाहिले. याचा परिणाम त्यांच्या बालमनावर झाला. ब्राह्मण धर्मानुसार त्यांची मुंज करण्याचा विधी वडील ठरवतात. मात्र या उपनयन विधीस बसवेश्वरांनी विरोध केला. यावेळी ते आठ वर्षांचे होते. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांची विवेकबुध्दी जागृत झाली. उपनयन विधीस नकार दिल्याने वडिलांसोबत भांडण झाले. यातूनच त्यांनी घर सोडले. एकूणच बसवेश्वर हे लहानाचे मोठे होत असताना विवेक आणि विचार करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त झाले. नंतरच्या काळात बसवेश्वरांनी कुडलसंगम येथे वास्तव्य केले. येथे त्यांना सच्चिदानंद स्वरुप शिवत्त्वाचा साक्षात्कार झाला. आणि भक्ती ही त्यांच्या जीवनाचा ध्यास बनली. येथील वास्तव्यात संगमेश्वराच्या



Scanned by CamScanner

उपासनेमध्ये अधिक वेळ घालवू लागले. यातून बसवेश्वरांच्या जीवनात हळूहळू क्रांतीकारक बदल घडून येऊ लागला. कारण कृष्णा आणि मलप्रभा या नद्यांचा संगम. तेथील निसर्ग व शिवभक्ती याचा परिणाम झाला. शिवभक्तीमुळे अनेक भक्त बसवेश्वरांना अनुसरु लागले बसवेश्वरांची आत्मशक्ती हळूहळू विकसित होत गेली. बसवेश्वरांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी गंगाबिकाशी झाला. कारण वाढलेला लोकमानसावरील बसवेश्वरांचा प्रभाव होता. हा प्रभाव मामाच्या नजरेतून सुटला नाही. पुढे बसवेश्वरांची आत्मशक्ती वाढली. विवाह ही गोष्ट आत्मविकासाच्या मार्गात कधीच आड आली नाही. बसवेश्वरांना इंगलेश्वर बागेवाडी येथे मनाला शांती मिळाली. जिवाशिवाचे ऐक्य या ठिकाणी त्यांना गवसले.

एक दिवशी झोपेत असताना त्यांच्या गूढ शक्तीने मंगळवाडा येथे जाण्याचा आदेश दिला नंतर ते कल्याणीला गेले. येथील वास्तव्यात बसवेश्वरांचा आत्मोध्दार झाल्यानंतर ते आता जनसाधारणांना विकासाचा मार्ग दाखविण्यासाठी कार्य करीत होते. हे तेथील गुरुंना समजले. त्यांच्या ज्ञानामुळे बिज्जलच्या कचेरीत ते कारकून म्हणून काम पाहू लागले. मात्र थोड्याच दिवसांत त्यांनी भांडारी हे सिध्दरसाचे पद मिळविले. पुढे ते बिज्जलचे मंत्री झाले. या काळात बसवेश्वरांच्या पारमार्थिक व्यक्तिमत्त्वाचा, बुध्दिमत्तेचा आणि कर्तृत्वाचा विलक्षण प्रभाव पडला होता. त्यांना समाजात वाढलेल्या कर्मकांड आणि अंधश्रध्दा कमी करायच्या होती. समाजाचा पाया बदलल्याशिवाय रचना बदलता येणार नाही. याची जाणीव बसवेश्वरांना होती. बसवेश्वरांनी फक्त वीरशैव धर्माचा उपदेश व प्रसार केला नाही तर ते एक रससिध्द जातीचे कवी होते. हे त्यांच्या कन्नडमध्ये लिहिलेल्या साहित्य रचनेवरुन लक्षात येते.

बसवेश्वरांनी जात,धर्म, पंथ, भेद झुगारुन दिल्याने माणसाला माणूस म्हणून समान पातळीवर जगता यावे यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे धार्मिक आणि सामाजिक दृष्ट्या ते या वेळेपासून क्रांतीकारक ठरु लागले. या त्यांच्या कार्यामुळे ते फक्त मंत्री नव्हते तर एक धार्मिक चळवळ उभी करणारा नेता म्हणून त्यांची ख्याती होऊ लागली होती. राजसत्तेच्या माध्यमातून बसवेश्वरांनी लोककल्याण साधण्याचा प्रयत्न केला. १२ व्या शतकातील तत्त्कालीन परिस्थिती फारच बीकट होती. अशा वेळी धार्मिक व सामाजिक स्थितीत सुधारणा करण्याचे आवाहन त्यांच्या समोर होते. मात्र त्यांनी अहिंसेच्या आणि भक्तीच्या परमंगल व परम कल्याणकारी अधिष्ठानावर संघटन सुरु केले. त्यामुळे माणसांच्या मनात नवचैतन्य निर्माण झाले. याचे प्रत्यंतर पुढील विधानातून आपणास येऊ शकते. ''शिवानुभव मंटपाची स्थापना झाली. या मंटपातून श्री प्रभुदेव, श्री बसवेश्वर, श्री चन्न बसवेश्वर यांच्यासारख्या अधिकारी आत्मानुभावी तत्वचिंतकाच्या मांडीला मांडी लावून ढोर कक्कय्या ढोर जातीचा, मधुवय्या-ब्राह्मण, हरळय्या-चांभार, अंबिगरचौडय्या-नावाडी, मेदार धूळय्या -बुरूड, वक्कल मुद्दय्या-शेतकरी, बाची काय कद बसवाप्पा-सुतार, हडपद अप्पाण्णा-न्हावी, किन्नरी ब्राह्मय्या-सोनार, हक्कदबोम्मण्णा-रणशिंग वाजवणारा, तुरुंगाही रामण्णा-गुराखी, तळवार कामिदेव-सनदी, मनुमुनी-जैनगुरु, नुलीयचंदय्या-दोरखंड वळणारा, हेंदड मारय्या - न दारुगुन्तेदार, किरात संगय्या-पारधी अशी समाजातल्या सर्व स्तरातील विविध व्यवसायातील माणसे, कृत्रिम सामाजिक प्रतिष्ठेला व उच्चनीच भेदभावाला विसरुन एकत्र बसून धर्मचर्चा करु लागली. महादेवी अक्का, अक्क नागम्मा, मुक्तायक्का, नंबियक्का, नीलम्मा, गंगाबिका,



Scanned by CamScanner

राणी महादेवी, राणी बोंतादेवी वगैरे स्त्रियाही या धर्मचर्चेत तन्मयतेने सहभागी झाल्या.'' येथे त्यांच्या कार्याचा आवाका लक्षात येऊ शकतो जातीयता नष्ट करुन समानता निर्माण करण्यासाठी त्यांचे कार्य सुरु होते.

बसवेश्वर हे जसे संत होते तसे ते क्रांतीकारक, समाजसुधारक होते. आध्यात्माची वाटचाल करीत ते समाजात मुलभूत बदल घडवण्यासाठी कार्य करीत होते. क्रांतीकारक म्हणून ते प्रसिध्दीस येत होते. १२ व्या शतकात त्यांनी कोणतीही जात-पात मानली नाही. वर्णव्यवस्था नष्ट करण्यासाठी समतेची वैचारीक चळवळ सुरु केली. त्यांनी स्त्री-पुरुष भेदभाव मानला नाही. माणसाला माणूस म्हणून आयुष्य व्यतीत करता यावे यासाठी कार्य केले. असे कार्य करणारे बसवेश्वर हे पहिले क्रांतीकारक होते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी संगमच्या या अस्पश्याबरोबर ते जेवले. इतकेच नव्हे तर त्यांनी कल्याणीतील मधुवारस ब्राह्मणाच्या मुलीचा विवाह हरळय्या या अस्पृश्य मुलाशी घडवून आणला. बालविवाहाला विरोध करुन विधवा विवाहास मान्यता दिली. अशी वेगळी चळवळ त्यांनी उभी केली. १९ व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी अशा चळवळीच्या माध्यमातून समाजजागृतीचे काम केले आहे. मात्र बसवेश्वरांनी १२ व्या शतकात हे कार्य सुरु केले होते. स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडला. स्त्रीला पूर्वीपासूनच समाजात दुय्यम स्थान दिले. स्त्री ही कोणत्याही कामात कमी नाही तर ती पुरुषाबरोबर प्रत्येक ठिकाणी कार्य करु शकते हे त्यांनी सांगितले व स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अक्कमहादेवी व इतर स्त्रियांची नावे घेता येतात. स्त्रीच्या भोवती समाजाने बांधल्या गेलेल्या भिंती १२ व्या शतकात बसवेश्वरांनी कणखरपणे पाडून टाकण्याचा प्रयत्न केला. त्याकाळात वीरशैव पंथात पुरुषांबरोबर स्त्रियांनाही लिंगदीक्षा दिल्या गेल्या. बसवेश्वरांचा हा विचार समतेचे अधिष्ठान देणारा आहे.

जीवनात निकोपपणे सरळ मार्गाने सामोरे जाणे हा त्यांचा साधा विचार पण महत्त्वाचा होता. धर्माचे स्तोम माजवणाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम बसवेश्वरांनी केले. इहलोक आणि परलोक हा वेगळा असून इहलोकाला त्यांनी महत्त्व दिले. परलोकी स्वर्ग नावाची वसाहत अस्तित्वात नाही. हे सांगताना बसवेश्वर म्हणतात.- ''देवलोक आणि मर्त्यलोक हे दोन्ही वेगवेगळे नाहीत. जेथे सत्य, शील, करुणा, माणूसकी हे सद्गुण आहेत. तेथेच स्वर्ग नांदत असतो. हा स्वर्ग आकाशात कोठे नाही. तो या पृथ्वीवर आपल्या मनातच असू शकतो. पण जेथे सदाचार नाही, मूर्तिमंत अन्याय आणि अनाचार आहे तोच नरक आहे. स्वर्ग आणि नरक यांचे अस्तित्व आपल्या ठायीच आहे. ''

एकूणच येथे बसवेश्वर तर्कशुध्द इहजीवनवादी विचार मांडताना दिसतात. त्यांनी इहजीवना बरोबर श्रमाचा गौरव भारतीय तत्त्वज्ञानात प्रथमता केला आहे. हा गौरव करताना बसवेश्वरांनी माणूस केंद्रबिंदू मानला आहे.

बसवेश्वरांनी संप्रदायाचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी संस्कृत ऐवजी कन्नड भाषेतून ग्रंथसंपदा लिहिली. त्यासाठी त्यांनी 'वचन' हा साहित्याचा प्रकार हाताळला. साध्या, सोप्या, प्रभावशाली व परिणामकारक अशा साहित्यनिर्मितीतून त्यांनी वीरशैव संप्रदायाचे तत्त्वविचार मांडले. 'षट्स्थलवर्णन', 'कालज्ञान', ' मंत्रगौप्य', 'शिवारत्न



ISSN No. 2319-6025

वचन' इ. या ग्रंथाचे लेखन केले. हे ग्रंथ कन्नड साहित्य वाङ्मयात श्रेष्ठस्थानी आहेत. बसवेश्वर शेवटी पुन्हा कुंडलसंगम येथे आले. कारण सामाजिक कार्य करत असताना त्यांनी घडवून आणलेला आंतरजातीय विवाह हा कारणीभूत ठरला. हा विवाह बिज्जलला सहन झाला नाही. तसेच बसवेश्वरांची प्रसिध्दी सर्वत्र पसरु लागली होती. त्यामुळे बिज्जलाने त्या पती-पत्नीची अमानुष हत्या केली. ही घटना बसवेश्वरांना धक्का देणारी ठरली. इतकेच नव्हे तर बिज्जलने बसवेश्वरांच्या वीरशैवर संप्रदायात असलेल्या दोन अनुयायांचा वध केला. त्यामुळे सुडाची प्रवृत्ती निर्माण होवून वीरशैव व जैन यांच्यात संघष पेटला. मोठे युध्द झाले. या युध्दात बिज्जलचा राजवंश नष्ट झाला. या सर्व घटनांचा परिणाम असा झाला की, बसवेश्वरांनी कल्याणीचा त्याग केला आणि ते परत कुडलसंगम येथे आले. कुडलसंगम येथे सोमेश्वराच्या संगमापाशी स्वत:च्या देहाचा त्यांनी त्याग केला. विश्वाला सत्याचा मार्ग दाखवणाऱ्या बसवेश्वरांना अशा प्रचंड दिव्यातून जावे लागले. अशा या महात्म्याने भारताच्या विविध भागात मठ स्थापन करुन वीरशैव संप्रदायाचे विचार समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ**

१. डॉ.प्रा.र.बा.मंचरकर (संपादक) - वीरशैव संप्रदाय, पहिली आवृत्ती, सप्टेंबर १९८९, पृष्ठ ५१.

२. डॉ. अ.ना. देशपांडे - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग ३, व्हीनस प्रकाशन, आवृत्ती दुसरी मे.२००२, पृष्ठ १७२

३. ह.श्री. शेणोलीकर - प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप, मोघे प्रकाशन, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २०११

* * * * * *



Scanned by CamScanner